कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालये तसेच खुद्द विभागासाठी संगणकीकरणाचे प्रकल्प राबविण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समितीची (P.I.C.) पुनर्रचना करण्याबाबत ........

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

**शासन निर्णय क्र.कौविउ-२०१५/प्र.क्र.२९५/प्रशा-१**

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक :- २८/१०/२०१५.

<u>वाचा :-</u> १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीओएम-१००१/प्र.क्र.१७४/०१/३९, दि.२९/१०/२००१

२) सामान्य प्रशासन विभाग क्र.सीओएम-१०९८/प्र.क्र.५१/९८/३९, दि.१५/०२/२००५

३) सामान्य प्रशासन विभाग शासन शुद्धीपत्रक क्र.सीओएम-१००१/प्र.क्र.१७४/०१/३९ दि.२८/०३/२००५

४) रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्र.ईएसई-२००३/प्र.क्र.२०/रोस्वरो-१, दि.१७/०७/२००३.

५) रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्र.ईएसई-२००३/प्र.क्र.२०/रोस्वरो-१, दि.२७/०६/२०११.

६) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंस-२०११/प्र.क्र.१२५/३९, दि.२३/०९/२०११

७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-०८१२/प्र.क्र.१०५/२०१२/समन्वय, दि.१५/१०/२०१२.

८) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र.कौविऊ-२०१५/प्र.क्र.१९०/प्रशा-१, दि.०२/०९/२०१५.

**<u>प्रस्तावना</u> :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त संदर्भ क्र.१ येथे नमूद दि.२९/१०/२००१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विभागाच्या संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्यासाठी विभागाच्या उक्त संदर्भ क्र.४ येथे नमूद दिनांक १७/७/२००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प अंमलबजावणी समितीची स्थापना करण्यात आली होती. तद्नंतर उक्त संदर्भ क्र.३ येथे नमूद दिनांक २८/०३/२००५ रोजीच्या सामान्य प्रशासन विभाग शुद्धीपत्रकामधील तरतूदीनुसार विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीमध्ये तांत्रिक मार्गदर्शनासाठी दोन तज्ञ सदस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. विभागासाठी गठीत

करण्यात आलेली प्रकल्प अंमलबजावणी समिती ही फक्त तत्कालीन रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाशी संबंधित ( सध्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय ) संगणकीकरणाशी संबंधित प्रकल्पासाठी गठीत करण्यात आली होती.

दिनांक ०२/०९/२०१५ पर्यंत विभागाच्या अधिनस्त फक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय हे एकमेव क्षेत्रीय कार्यालय कार्यरत होते. तथापि उक्त संदर्भ क्र.८ येथील दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय हे कार्यालय तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालये / संस्था व त्यांचेशी संबंधित उच्च व तंत्र शिक्षण विभागातील संबंधित कार्यासने या विभागाच्या नियंत्रणाखाली आली आहेत. सदरची कार्यालये या विभागाच्या अधिनस्त येण्यापूर्वी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ई-प्रशासनाचे प्रकल्प राबविण्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उक्त संदर्भ क्र.७ येथील दिनांक १५/१०/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) गठीत केलेली आहे. तथापि, आता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय हे कार्यालय तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालये या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आलेली असल्यामुळे सदर कार्यालयांकरितासुद्धा या विभागाच्या अधिनस्त प्रकल्प अंमलबजावणी समितीचे गठन करणे आवश्यक आहे. त्यामुळे आता, विभागाच्या अधिनस्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालये या सर्वांकरीता प्रकल्प अंमलबजावणी समितीची (P.I.C.) पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त संदर्भ क्र.२ येथील दि.१५/२/२००५ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच उक्त संदर्भ क्र.६ येथील दिनांक २३/९/२०११ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीमध्ये एन.आय.सी. सभासदांची तज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती करण्याची बाबसुद्धा शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा तसेच अधिनस्त कार्यालयांचा सर्वंकष ई-प्रशासन प्रकल्प राबविण्यासाठी उक्त संदर्भाधिन क्र.४ येथील दिनांक १७/०७/२००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची (P.I.C.) सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त संदर्भ अनु क्र.१,३ तसेच क्र.६ येथील शासन निर्णयातील तरतुदींच्या अधिन राहून पुढीलप्रमाणे पुनर्रचना करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

१. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग : अध्यक्ष
२. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय (सामान्य प्रशासन विभाग : सदस्य
३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय/
संचालक, व्यवसाय शिक्षण संचालनालय /
संचालक, व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय : सदस्य
४. उप सचिव, वित्त विभाग : सदस्य
५. उप सचिव, नियोजन विभाग : सदस्य
६. प्रो.पी.के.पंड्या,
टाटा इन्सटीट्यूट ऑफ फंडामेन्टल रिसर्च (TIFR), मुंबई : तज्ञ सदस्य
७. महाव्यवस्थापक, व्यवसाय विकास, भारत संचार निगम लि.
(BSNL) मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी : तज्ञ सदस्य
८. राज्य सूचना अधिकारी, एन.आय.सी., मुंबई : तज्ञ सदस्य
९. सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय /
उप संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय : सदस्य
१०.सह सचिव/ उप सचिव संबंधित मंत्रालयीन कार्यासन,
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग : सदस्य सचिव

उपरोक्त क्र. ६ व ७ वरील तज्ञ सदस्यांना उक्त संदर्भाधिन अनु क्र.२ येथे नमूद दिनांक १५/०२/२००५ मधील तरतूदीनुसार या विभागाच्या संगणकीकरण अंमलबजावणी समितीच्या बैठकांना उपस्थित राहिल्याबद्दल प्रति बैठक रु.१०००/- एवढे एकत्रित मानधन (प्रवासभत्त्यासह) अनुज्ञेय राहील.

२. उपरोक्त क्र.८ येथील एन.आय.सी. चे तज्ञ सदस्यांची नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त संदर्भ क्र. २ येथील दि.१५/२/२००५ व संदर्भ क्र.६ येथील दिनांक २३/९/२०११ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

३. ही समिती उक्त संदर्भाधिन क्र.१ सामान्य प्रशासन विभाग दि.२९/१०/२००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार काम करेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१५१०२८१११०४२१५०३ असा आहे. हा आदेश आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Samridhi V Angolkar

Digitally signed by Samridhi V Angolkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samridhi V Angolkar
Date: 2015.10.28 11:12:57 +05'30'

**( समृद्धी वि.अनगोळकर )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव.
४) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मंबई.
५) सर्व मा.विधान सभा/मा.विधान परिषद सदस्य,
६) मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
८) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
९) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नीव मुंबई.
१३) संचालक, व्यवसाय शिक्षण संचालनालय
१४) संचालक, व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय
१५) प्रो.पी.के.पंड्या, टाटा इन्सटीट्यूट ऑफ फंडामेन्टल रिसर्च (TIFR), मुंबई
१६) महाव्यवस्थापक, व्यवसाय विकास, भारत संचार निगम लि. (BSNL) मुंबई
१७) राज्य सूचना अधिकारी, एन.आय.सी., मुंबई
१८) सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
१९) उप संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय,
२०) सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
२१) निवडनस्ती (प्रशा-१).